INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor 6.625

E-ISSN : 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue - 318 (B) April - 2023

## Dr. Babasaheb Ambedkar's Relevance to Inclusive Development in Contemporary India



EDITORIAL BOARD

Guest Editor of the Issue :
Dr. Pramod Herode,
Principal,
Dr. Ambedkar College of Law, Nagsenvana
Aurangabad, Maharashtra .

Executive Editors of the Issue:
Dr. Gatha G. Nerlikar
Mr. Naresh W. Patil
Dr. Shilparani Dongre

Chief Editor :
Dr. Dhanraj T. Dhangar

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 26. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : भारतीय थोर समाजसुधारक | प्रा. बनसोडे सुवर्णा |
| 27. | महिला सक्षमीकरणात भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान | डॉ. जयश्री चव्हाण |
| 28. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर - महान राष्ट्रनिर्माता | प्रा. गणेश मोरे |
| 29. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थशास्त्रावरील विचार | अनिल पठाडे |
| 30. | राष्ट्रीय निर्माण प्रक्रियेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अतुलनीय योगदान | डॉ. श्रीराम भालेराव |
| 31. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संगीत | प्रा. नाना जाधव |
| 32. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांची सद्यस्थितीतील उपयुक्तता | डॉ. साधना पाटील |
| 33. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : बुद्धिझम आणि लोकशाही मुल्ये | डॉ. वर्षा बी. पाटील |
| 34. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही आणि घटनावादासंबंधीचे विचार | प्रा. अमोल गाढे |
| 35. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सक्षमीकरण | डॉ. मंगला कडवे |
| 36. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर,बौद्ध धर्म व ललित कलेतील त्यांचे संगीतातील स्थान | प्रा.शरद ग[illegible]भये |
| 37. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सक्षमीकरणातील योगदान | प्रा.संध्या पा.फटिंग |
| 38. | भारतीय संविधानातील मूलभूत हक्क आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर | कल्पना डवले |
| 39. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता आणि सद्यस्थिती | डॉ. सीमा सैंदाणे |
| 40. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सक्षमीकरणात योगदान | डॉ. पौर्णिमा गंथडे |
| 41. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक आणि राजकीय विचार | डॉ. राज चव्हाण, प्रा. सोनिया चव्हाण |



*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the pap responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can re these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

Scanned with OKEN Scanner

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संगीत

प्रा. नाना जाधव
डॉ.एल.डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स
ॲण्ड कॉमर्स पवनी, जि.भंडारा.

**प्रस्तावना:**

भारतीय समाजाच्या इतिहासाचा अभ्यास केला असता, असे निदर्शनास येते की, भारत भूमीवर अनेक थोर विचारवंत होऊन गेले, जसे की, तथागत भगवान गौतम बुद्ध, संत कबीर,महात्मा ज्योतिबा फुले, संत तुकाराम, संत गाडगे बाबा, संत तुकडोजी महाराज या प्रत्येक विचारवंतानी आपआपल्या विचारांच्या गाथा, दोहे, पोवाडे, कवने, अभंगवाणी, किर्तन, व ग्रामगीताच्या माधमातून आपले विचार समाजाला बहाल केले. आणि या विचारांनी ललित साहित्य, गद्य, पद्य, गीत, संगीताच्या माध्यमातून भारतीय समाजात नवचैतन्य निर्माण केले.जसे की,सांगीतिक घराण्यामध्ये आपल्या गुरूंची गायकी शि य आत्मसात करून त्याची खुप साधना करायचे व त्याची जोपासना करून पुढिल पिढीला ती गायकी अर्पण करायचे, त्याचप्रमाणे बोधिसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही आपल्या तीनही गुरूंचे विचार स्वत: आचरणात आणून भारतीय समाजाला उच्चंतम राज्यघटना बहाल तर केलीच, पण अहोरात्र अभ्यास व कष्ट करून उच्चंतम विचारांचा शोध लावला, आणि आजही ते विचार, गद्यांच्या, पद्यांच्या व गीतांच्या माध्यमातून मानव जातीच्या कल्याणाचे मार्ग ठरले,

पुढे बाबासाहेबाच्या अनूयायींनी,कवि, गीतकार, गायकांनी, व विचारवंतानी अनेक विचार आपआपल्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला, मग ते सामाजिक विचार असोत, राजकीय विचार, आर्थिक विचार, कायदेविषयक विचार, धार्मिक विचार, मानसशास्त्रीय विचार असोत, पण त्यांचे सांगीतिक विचार खुप कमी संशोधकांनी मांडले, तसे पहाता डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संगीत यांचे नाते खुप जबरदस्त आहे. कारण जीथे बाबासाहेब आहेत, तिथे संगीत आहे. त्यांनी आपल्या जीवनात संगीताला दिलेले महत्व अनन्यसाधारण आहे. व त्याचेच रेखाटन करण्याचा अल्पसा प्रयत्न मी खालील प्रमाणे करत आहे.

जेंव्हा आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या बालपणाकडे लक्ष वेदतो. तेंव्हा आपल्या लक्षात येते की, बाबासाहेबांवर बालपणापासूनच संगीताचे संस्कार झालेले दिसतात, कारण बाबासाहेबाचे वडील रामजी सुभेदार हे कबीरपंथी असल्यामुळे ते सर्वासमवेत कबीरांचे दोहे गायचे, त्यांची दिवसाची सुरुवात व रात्रींची समाप्ती कबीरांच्या दोहयांनीच व्हायची. रात्र–रात्र त्यांच्या घरामध्ये कबीराचे भजन चालायचे, जसे की – **कबीरां कहें ये जगं अंधा, अंधी जैसी गाय, बछडा थां सों मर गया, झुटी जाम चटाऐ,** अशा प्रकारच्या दोहयातुन बाबासाहेबांवर संगीताच्या माध्यमातून संस्कार झाले.

पुढील भजनामध्ये – **मन लागो मेरों यार फकीरीं मे,जों सुख पायों राम भजन मे सो सुख नाही अमिरी मे,** अशा प्रकारच्या कबीरांच्या दोहयांचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर जबरदस्त प्रभाव झाला. व याच संस्कारामुळे डॉ.बाबासाहेबांनी कबीरांच्या जीवनाचा अभ्यास केला. व त्यांना गुरु माणून, त्यांच्या विचारांचा वारसा अंगीकारला, केळूस्कर गुरुजी यांनी बुद्ध चरित्र हे पुस्तक बाबासाहेबाना भेट म्हणून दिले. आणि पुढे बाबासाहेबानी बुद्ध साहित्यांचाही खूप अभ्यास केला. आणि बुद्धांना सुद्धा आपले गुरु माणले, कारण बुद्ध साहित्यातील गाथेचे संस्कार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर खूप प्रमाणात झाले, आणि ते संस्कार आपल्या अनुयायांना धर्मांतराच्या सोहळयात अर्पण केले. जसे की – **वंदना, सरणंत्तय, पंचशिल.** तसेच अनेक बौद्ध



Scanned with OKEN Scanner